संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,
महाराष्ट्र शासन, मुंबई - ४०० ०९८.

# अग्निशमन सेवा सप्ताह

**संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र शासन आणि**
**मुंबई अग्निशमन दल आयोजित**

# औद्योगिक आग विझविण्यासाठीच्या कवायतींच्या स्पर्धा

## नियम, दंड (गुण कपात) आणि करंडक/ढाली

औद्योगिक आग विझविण्यासाठीच्या कवायतींच्या स्पर्धेत पुढील सात स्पर्धा प्रकारांचा समावेश होतो. या स्पर्धेमध्ये महाराष्ट राज्यातील कोणत्याही उद्योगास भाग घेता येईल. या स्पर्धेमध्ये उद्योग, प्रशासनिक संस्था, हॉटेल किंवा अन्य कोणताही भोगवटा यातील अधिकारी, कामगार वर्ग, प्रशासनिक कर्मचारी किंवा अन्य कोणतेही कर्मचारी यांना भाग घेता येईल.

आग लागली असण्याच्या परिस्थितीत, संबंधित कर्मचारी/सदस्य यांनी वापरावच्या अथवा हाताळावयाची अग्निशमन साधन-सामग्री विचारात घेऊन स्पर्धेतील स्पर्धा प्रकारांचा विचार करण्यांत आला आहे. स्पर्धेत पुढील स्पर्धा प्रकारांचा समावेश आहे :-

**स्पर्धा प्रकार :**

१. पुरुष कामगार व सुरक्षा कर्मचारी यांच्यासाठी असलेली एका व्यक्तीने केलेली अग्निशमन कवायत
२. अधिका-यांसाठी असलेली एका व्यक्तीने केलेली अग्निशमन कवायत
३. महिला कामगार आणि कर्मचारी यांच्यासाठी असलेली एका व्यक्तीने केलेली अग्निशमन कवायत
४. महिलांसाठी असलेली स्वयंपाक घरातील आग विझविण्यासाठीची अग्निशमन कवायत
५. पुरुष कामगार व कर्मचारी यांच्यासाठी असलेली एका व्यक्तीने होज गुडाळीने केलेली अग्निशमन कवायत
६. अधिका-यांसाठी असलेली दोन व्यक्तींनी नळखांबातील पाण्याने आग विझविण्यासाठी केलेली कवायत
७. संघप्रमुखासह चार व्यक्तींनी दोन भागात नळखांबातील पाण्याने आग विझविण्यासाठी केलेली कवायत

**टिप :-**

१. स्पर्धा प्रकार क्र. ३ व ४ यांचा संघाची एकूण सर्वोत्कृष्ठ कामगिरी ठरविण्यासाठी विचार केला जाणार नाही.

२. स्पर्धा प्रकार क्र.२, ६ व ७ यांचा त्या वर्षातील उत्कृष्ठ अधिकारी ठरविण्यासाठी विचार केला जाईल.

* * * * *

**स्पर्धा प्रकार क्र. १**

या स्पर्धा प्रकारात फक्त एकच स्पर्धक भाग घेईल. प्रत्येक गटातून भाग घेणा-या एका व्यक्तीस कवायत करुन दाखविण्यासाठी लागलेल्या कालावधीची स्वतंत्र नोंद घेण्यांत येईल आणि या कमीत कमी कालावधी लागलेल्या स्पर्धकास विजेता घोषित करण्यांत येईल. त्यानंतर सर्वोत्कृष्ठ ठरलेल्या दोन स्पर्धकांना दुसरे व तिसरे स्थान देण्यांत येईल.

**स्पर्धा प्रकार क्र. २**

हया स्पर्धा प्रकारात सुरक्षा अधिकारी आणि अन्य अधिकारी वैयक्तिकरित्या कवायत करुन दाखवतील. यात भाग घेतलेल्या ज्या स्पर्धकाला सर्वात कमी वेळ लागेल त्या स्पर्धकाला पहिला क्रमांक देण्यांत येईल आणि त्या खालोखाल सर्वोत्कृष्ठ कामगिरी करुन दाखविणा-या स्पर्धकांना दुसरे व तिसरे स्थान देण्यांत येईल.

**स्पर्धा प्रकार क्र. ३**

हया स्पर्धा प्रकारात प्रत्येक गटात दोन याप्रमाणे यात सहभागी झालेल्या सर्व महिला वैयक्तिकरीत्या कवायत करुन दाखवतील. प्रत्येक संघातील/गटातील प्रत्येक स्पर्धकास यासाठी लागलेल्या वेळाची नोंद घेण्यात येईल आणि ज्या गटास पूर्ण कवायत करण्यांस सर्वात कमी वेळ लागेल त्या गटास विजयी घोषित केले जाईल. त्या खालोखालच्या दोन संघास/गटास दुसरे व तिसरे स्थान देण्यांत येईल.

**स्पर्धा प्रकार क्र. ४**

हया स्पर्धा प्रकारात महिला कामगार किंवा कर्मचा-यांनी करुन दाखविण्याची वैयक्तिक कवायत असेल. यात भाग घेतलेल्या ज्या स्पर्धकास ती पूर्ण करण्यास सर्वात कमी वेळ लागेल अशा स्पर्धकास पहिला क्रमांक देण्यांत येईल आणि त्याखालोखाल सर्वोत्कृष्ठ कामगिरी करुन दाखविणा-यास दुसरे व तिसरे स्थ्ान देण्यांत येईल.

**स्पर्धा प्रकार क्र. ५**

हया स्पर्धा प्रकारात पुरुष कामगार आणि कर्मचा-यांना भाग घेता येईल. यात भाग धेतलेल्या ज्या स्पर्धकास सर्वात कमी वेळ लागेल त्यास पहिला क्रमांक देण्यांत येईल आणि त्याखालोखाल सर्वोत्कृष्ट कामगिरी करुन दाखविणा-या दोघांना दुसरे व तिसरे स्थ्ान देण्यांत येईल.

**स्पर्धा प्रकार क्र. ६**

हया स्पर्धा प्रकारात, दोन पुरुषांचा समावेश असून त्यापैकी आग विझविण्यासाठीची कवायत करणारा एक अधिकारी असेल आणि दुसरा फक्त पाणीपुरवठा सुरु आणि बंद करुन त्यास सहाय्य करील. या खेळात अधिकारी वैयक्तिक भाग घेईल आणि ज्याला स्पर्धा पूर्ण करुन दाखविण्यास सर्वात कमी वेळ लागेल त्यास विजयी घोषित करण्यांत येइल आणि त्या खालोखाल सर्वोत्कृष्ट कामगिरी करुन दाखविणा-या दोघांना दुसरे व तिसरे स्थ्ान देण्यांत येईल.

**स्पर्धा प्रकार क्र. ७**

हा चार व्यक्तींचा समावेश असलेला सांघिक स्पर्धा प्रकार असेल. ज्या संघास स्पर्धा पूर्ण करुन दाखविण्यास सर्वात कमी वेळ लागेल त्यास विजयी घोषित करण्यांत येईल आणि त्या खालोखाल सर्वोत्कृष्ठ कामगिरी करुन दाखविणा-या दोघांना दुसरे व तिसरे स्थ्ान देण्यांत येईल.

## पुरस्कार, करंडक, ढाली आणि प्रमाणपत्रे

प्रत्येक स्पर्धेत पहिले, दुसरे व तिसरे स्थान पटकावणा-या विजेत्यांना स्पर्धेची मानके व नियमानुसार प्रमाणपत्रे, करंडक व ढाली प्रदान केल्या जातील.

यशस्वी कामगिरी करुन दाखविणा-यांसाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे ठेवण्यांत आली आहेत :-

**०१. मुंबई अग्निशमन दल - प्रमुख अग्निशमन अधिकारी फिरता करंडक :**

१, २, ५, ६, व ७ क्रमांकावरील स्पर्धा प्रकार, जो संघ सर्वात कमी वेळात पूर्ण करेल त्यास हा करंडक देण्यांत येईल.

**०२. मॉन्शर्स रोलिंग फिरता करंडक :**

१ आणि २ क्रमांकावरील स्पर्धा प्रकार सर्वात कमी वेळात पूर्ण करेल त्या संघास हा करंडक देण्यांत येईल.

**०३. फायरेक्स रोलिंग फिरता करंडक :**

७ क्रमांकावरील स्पर्धा प्रकार सर्वात कमी वेळात पूर्ण करेल त्या संघास हा करंडक देण्यांत येईल.

**०४. वर्षातील सर्वोत्तम अग्निशमन अधिकारी :**

२ आणि ६ क्रमांकावरील स्पर्धा सर्वात कमी वेळात पूर्ण करेल त्या अग्निशमन अधिका-यास या बक्षिसाचा विजेता म्हणून घोषित करण्यांत येईल.

**०५. वर्षातील सर्वोत्तम अग्निशमन कर्मचारी :**

हे वैयक्तिक बक्षिस आहे. १, ५ व ७ क्रमांकावरील स्पर्धा प्रकारात भ्ाग घेणा-या व सर्वोत्कृष्ठ वैयक्तिक कामगिरी करणा-या कामगार वर्गातील कर्मचा-यास त्याचा गणवेश, नैपूण्य व कवायतीतील त्याची कामगिरी यांसारख्या सर्व बाजू विचारात घेऊन पंच त्याच्या कामगिरीचे मूल्यांकन करतील आणि त्याला या बक्षिसाचा विजेता घोषित केले जाईल.

**०६. वर्षातील सर्वोत्तम महिला अग्निशमन कर्मचारी :**

महिला कर्मचारी वर्गापैकी सर्वात कमी वेळात अग्निक कवायत तसेच नैपूण्य, साधनसामुग्रीची हाताळणी यासारख्या सर्व बाजू विचारात घेता सर्वोत्कृष्ठ कामगिरी करणा-या महिला कर्मचा-यास या बक्षिसाचा विजेता घोषित करण्यांत येईल. ३ व ४ क्रमांकाच्या स्पर्धा प्रकार या बक्षिसासाठी विचार केला जाईल.

* * * * *

## सर्वसाधारण सूचना

०१. संघाने नामनिर्दे्शित केलेला कर्मचारी संघाचा प्रमुख असेल, तो संघाचा सदस्य असू शके्ल आणि संघाची जबाबदारी त्याच्यावर असेल. कोणतेही आक्षेप घेण्याची केवळ त्यालाच परवानगी असेल आणि त्या संबंधात त्याला हरकतींचा मुददा उपस्थित करता येईल.

०२. कवायतींची स्पर्धा झाल्यानंतर लगेचच घेतलेले कोणतेही आक्षेप आणि त्यावर उपस्थित केलेले हरकतीचे मुददे यावर विचार करण्यांत येईल.

०३. कोणत्याही प्रकारचे उल्लंघन केल्यास, शिक्षांच्या सूचीतील शिक्षा केल्या जातील.

०४. होज लाईन फुटणे किंवा पंपात तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याच्या प्रकरणी, सदर दोष दुर्लक्ष केल्यामुळे किंवा चुकीमुळे झाला नाही असे पंचांचे मत झाल्यास, स्पर्धा प्रकार पुन्हा संधी देण्यांत येईल.

०५. सुरक्षा हेल्मेट (शिरस्त्राण), गुडघ्यापर्यंत लांबीचे बूट (गमबूट) किंवा सुरक्षित पादत्राणे, बॉयलर सूट व जाळीचा पटटा/चामडयाचा पटटा असा पोषाख असेल.

०६. नळखांब हा स्टॅन्ड पोस्ट प्रकारातील असेल व त्याला स्क्रू-डाऊन झडपा असतील. त्यासाठी फुलपाखराच्या आकाराच्या (आकडयांचा) वापर करण्यांत येईल.

०७. लांब होज पाईपावर दाब कमी करणा-या जोडणीला (कप्लींग) परवानगी असणार नाही. छोटी प्रमाणित नळी, जिचे तोंड ५/८ इंच रुंदीचे असेल, वापरता येईल.

०८. ज्वलना पूर्वीची वेळ प्रत्येक स्पर्धा प्रकारानुसार ठरविण्यांत येईल.

०९. नळखांबासंबंधातील कवायतींच्या सर्व स्पर्धा प्रकारांसाठी, नळखांबातून बाहेर पडणा-या पाण्याचा दाब ५ बार पेक्षा अधिक असणार नाही.

१०. पंचांचा निर्णय अंतिम असेल.

११. यात वर नमूद केलेल्या कोणत्याही सूचनांमध्ये सुधारणा अथवा बदल करण्याचा अधिकार आयोजकास असेल तसे करतांना त्याबाबतची पूर्वसूचना स्पर्धकांना द्यावी लागेल.

* * * * *

**स्पर्धा प्रकार. १ :- पुरुष कामगार व सुरक्षा कर्मचारी यांनी भाग घ्यावयाची एका व्यक्तीने करावयाची अग्निशमन कवायत ---**

१ X ५ कि.ग्रॅमचे डीसीपी अग्निशामक यंत्र
गुडघ्यापर्यंत लांबीचे रबरी बूट
हनूवटी झाकली जाईल अशा पटयासह (स्ट्रॅप) हेल्मेट आणि
इतर कपडे व जाळीचा पटटा (कॅनव्हास किंवा चामडयाचा)

**कवायत**

स्पर्धक, आरंभ रेषेपासून २५ फुटांवरील साधनसामुग्रीच्या रेषेपर्यंत धावत जाईल. तो तेथून ५ कि.ग्रॅमचे डीसीपी अग्निशामक यंत्र घेईल आणि १०० फूट धावेल आणि ट्रेमध्ये लावण्यात आलेली पेट्रोलची आग विझवेल. त्यानंतर तो, १५ फूटांवरील अंतिम रेषेपर्यंत अग्निशामक यंत्र घेऊन धावेल. आग विझविण्यासाठीची कवायत पूर्ण झाल्यावर पंच शिटटी वाजवील. यात सहभागी झालेल्या स्पर्धकांसाठी, स्पर्धा सुरु झाल्याची शिटटी वाजण्यापूर्वी, १० सेंकद अगोदर ट्रे मधील १/ २ लीटर पेट्रोलला आग लावली जाईल.

निरनिराळया उद्योगासमूहामधून यात सहभागी होणार सर्व स्पर्धक वैयक्तिकरित्या हा स्पर्धा प्रकार करुन दाखवतील.

हा स्पर्धा प्रकार करुन दाखविण्यास ज्यांना सर्वात कमी वेळ लागेल अशा. अंतिम फेरीसाठीच्या ४ स्पर्धकांची निवड करण्यासाठी आणि "वर्षातील सर्वोत्तम अग्निशामका"ची निवड करण्याची एक दिवस अगोदर गाळणी फेरी घेण्यांत येईल.

दुसरे म्हणजे (उद्योगातील सर्व ४ स्पर्धकांचा एकत्रित वेळ धरता) ज्याला स्पर्धा प्रकार पूर्ण करण्यांस सर्वात कमी वेळ लागेल त्यांला या स्पर्धा प्रकाराचा विजेता म्हणून घोषित केले जाईल.

या सर्व गोष्टींचा सर्व संघातील विजेता संघ ठरविण्यासाठी विचार केला जाईल.

**पंचांची बाजू**

आग विझविण्यासाठीच्या कवायतीत दोन बाजू असतील त्यापैकी एक म्हणजे, साधनसामुग्रीची बाजू आणि दुसरी बाजू म्हणजे आगीची बाजू (समोरील बाजू) अशा दोन बाजू पंचासाठी असतील. प्रत्येक बाजूसाठी एक स्वतंत्र पंच असेल. तसेच आणखी एक पंच, शिटटी वाजविणे, स्पर्धा प्रकाराला लागलेला एकूण वेळ याची नोंद ठेवणे यासाठी असेल आणि तो सर्वोच्च निर्णेता (रेफरी) असेल.

प्रत्येक पंचाकडे त्याच्यासमोर असलेल्या स्पर्धा प्रकाराच्या वेळेची नोंद घेण्याकरीता स्टॉप वॉच असेल. तीन पंचांनी नोंदविलेला खेळासाठी लागेलला सरासरी वेळ हा खेळासाठी लागलेला वेळ समजण्यांत येईल. स्पर्धेच्या आरंभी व ती संपतांना अशी दोनदा शिटटी वाजविली जाईल.

निर्णेताचा (रेफरी) निर्णय अंतिम राहील.

**टीप :-** आग विझविण्यासाठी घेतलेल्या कवायतीत सहभागी झालेल्या स्पर्धकाला झालेली कोणतीही इजा किंवा यात वापरलेल्या साधनसामुग्रीची झालेली हानी इ. यासाठी जबाबदारी असणार नाही.

| **दंड (गुण कपात)** | | **सेंकद** |
|---|---|---|
| **<u>(अ) साधनसामुग्रीची बाजू</u>** | | |
| ०१. | शिटटी वाजविण्यापूर्वी स्पर्धेस सुरुवात केल्यास | अपात्र |
| ०२ | हेल्मेट (शिरस्त्राण) किंवा इतरा काही किंवा गणवेशातील कोणतीही गोष्ट न घातल्यास | ०२ |
| ०३ | अंतिम शिटटी वाजण्यापूर्वी/अंतिम रेषा ओलांडण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेशातील कोणतही गोष्ट पुन्हा जागच्या जागी न ठेवल्यास | ०५ |
| ०४. | अग्निशामक यंत्र हातातून पडल्यास | ०५ |
| ०५. | आरंभ रेषा ओलांडण्यापूर्वी अग्निशामक यंत्र वापरण्यासाठी चालू केल्यास | ०५ |
| ०६. | अग्निशामक यंत्र धसमुसळेपणाने/अयोग्य रितीने हाताळल्यास | ०२ |
| **<u>(ब) आगीची बाजू</u>** | | |
| ०१. | अग्निशामक यंत्र कार्यान्वित करण्यापूर्वी प्रात्यक्षिक रेषा ओलांडणे | ०५ |
| ०२. | प्रात्यक्षिक रेषेवर अग्निशामक यंत्र चालू न केल्यास | ०५ |
| ०३. | अग्निशामक यंत्राचा धसमुसळेपणाने/अयोग्य वापर | ०२ |
| ०४. | शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील अन्य कोणतीही गोष्ट न घातल्यास | ०२ |
| ०५. | अंतिम रेषेपर्यंत पोचण्यापूर्वी/ शेवटची शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील कोणतीही वस्तू पुन्हा जागेवर न ठेवल्यास | ०५ |
| ०६. | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी अग्निशामक यंत्र पूर्णपणे बंद न केल्यास | ०५ |

| | | |
|---|---|---|
| ०७. | आग विझवितांना जळते इंधन (पेट्रोल) सांडून पसरल्यास | १० |
| ०८. | अग्निशामक यंत्र बंद न केल्यास | ०५ |
| ०९. | आग विझविता न आल्यास | अपात्र |
| १०. | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी अग्निशामक यंत्र पूर्णपणे बंद न केल्यास | ०५ |

* * * * *

**स्पर्धा प्रकार क्र. २ :- सुरक्षा अधिकारी व अन्य अधिकारी यांच्यासाठीची, एका व्यक्तीने करावयाची, आग विझविण्यासाठीची कवायत/अग्निशमन कवायत**

१ X ५ कि.ग्रॅमचे डीसीपी अग्निशामक यंत्र
गुडघ्यापर्यंत लांबीचे रबरी गमबूट
हनूवटी झाकली जाईल अशा पटयासह (स्ट्रॅप) हेल्मेट आणि
बॉयलर सूट व जाळीचा पटटा (कॅनव्हास किंवा चामडयाचा)

**कवायत**

स्पर्धक आरंभ रेषेपासून २५ फूटावरील साधनसामुग्रीच्या रेषेपर्यंत धावत जाईल. तो तेथून ५ कि.ग्रॅम. डीसीपी अग्निशामक यंत्र घेईल १०० फूट धावेल आणि ट्रेमध्ये लावण्यांत आलेल्या पेट्रोलची आग विझवेल. त्यानंतर तो, १५ फूटांवरील अंतिम रेषपर्यंत अग्निशामक यंत्र घेऊन धावत जाईल. अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी अग्निशामक यंत्र बंद केले पाहिजे. आग विझविण्यासाठीची कवायत पूर्ण झाल्यानंतर पंच शिटटी वाजवतील.

यात सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकासाठी, स्पर्धा प्रकार सुरु होण्यासाठीची शिटटी वाजण्यापूर्वी १० सेकंद अगोदर १ /२ लिटर पेट्रोलला आग लावण्यांत येईल.

निरनिराळया उद्योगांमधून या स्पर्धा प्रकारांमध्ये सहभागी होणारे सर्व स्पर्धक वैयक्तिकरित्या हा स्पर्धा प्रकार करुन दाखवतील.

हा स्पर्धा प्रकार करुन दाखविण्यास ज्यांना सर्वात कमी वेळ लागला असेल अशा अंतिम फेरीत प्रवेश द्यावयाच्या ४ स्पर्धकांची निवड करण्यासाठी आणि या वर्षातील सर्वोत्तम अग्निशामकाची निवड करण्यासाठी एक दिवस अगोदर गाळणी फेरी घेण्यांत येईल.

दुसरे म्हणजे (उद्योगांतील सर्व ४ स्पर्धकाच्या एकत्रित वेळांमध्ये) ज्याला स्पधा प्रकार करुन दाखविण्यास सर्वात कमी वेळ लागेल त्याला स्पर्धा प्रकाराचा विजेता म्हणून घोषित केले जाईल.
या सर्व गोष्टींचा, सर्व स्पर्धांमधील विजेता संघ ठरविण्यासाठी विचार केला जाईल.

**पंचांची बाजू**

आग विझविण्यासाठीच्या कवायतीत पंचाच्या दोन बाजू असतील. त्यापैकी एक म्हणजे, साधनसामुग्रीची बाजू (मागील बाजू) व दुसरी म्हणजे आगीची बाजू (समोरील बाजू). प्रत्येक बाजूकडील कामगिरी पाहण्यासाठी प्रत्येक बाजूसाठी स्वतंत्र पंच नियुक्त केले जातील. तसेच शिटटी वाजविणे, खेळाला लागलेल्या एकूण वेळाची नोंद ठेवणे याकरीता आणखी एक पंच असेल आणि तो सर्वाच्च निर्णेता (रेफरी) असेल.

प्रत्येक पंचाकडे त्याच्यासमोर सुरु असलेल्या खेळाच्या वेळेची नोद घेण्याकरीता स्टॉपवॉच असेल. तीन पंचांनी घेतलेल्या खेळासाठी लागलेल्या वेळाच्या नोंदीची सरासरी काढण्यात येईल. स्पर्धेच्या आरंभी व ती संपतेवेळी याप्रमाणे दोनदा शिटटी वाजविण्यांत येईल.

निर्णेताचा (रेफरीचा) निर्णय अंतिम राहील.

**टीप :-** आग विझविण्यासाठी घेतलेल्या कवायतीत सहभागी झालेल्या स्पर्धकाला झालेली कोणतीही इजा किंवा यात वापरलेल्या साधनसामुग्रीची झालेली हानी अशा कोणत्याही गोष्टीसाठी आयोक जबाबदार असणार नाही.

| **दंड (गुणकपात)** | | **सेंकद** |
|---|---|---|
| **<u>(अ) साधनसामुग्रीची बाजू</u>** | | |
| ०१. | शिटटी वाजविण्यापूर्वी स्पर्धेस सुरुवात केल्यास | अपात्र |
| ०२. | हेल्मेट (शिरस्त्राण) किंवा इतर काही किंवा गणवेशातील कोणतीही गोष्ट न घातल्यास | ०२ |
| ०३ | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी /अंतिम शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेशातील कोणतीही वस्तू पून्हा जागच्या जागी न ठेवल्यास | ०५ |
| ०४. | अग्निशामक यंत्र बंद न केल्यास | ०५ |
| ०५. | आरंभ रेषा ओलांडण्यापूर्वी अग्निशामक यंत्र चालू केल्यास | ०५ |
| ०६. | अग्निशामक यंत्र धसमुसळेपणाने/अयोग्य रितीने हाताळल्यास | ०२ |
| **<u>(ब) आगीची बाजू</u>** | | |
| ०१. | अग्निशामक यंत्र चालू करण्यापूर्वी प्रात्यक्षिक रेषा ओलांडल्यास | ०५ |
| ०२. | प्रात्यक्षिक रेषेवर अग्निशामक यंत्र चालू न केल्यास | ०५ |
| ०३. | अग्निशामक यंत्राचा धसमुसळेपणाने/अयोग्य वापर | ०२ |
| ०४. | शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील अन्य कोणतीही वस्तू न घातल्यास | ०२ |
| ०५. | अंतिम रेषेपर्यंत पोचण्यापूर्वी/ शेवटची शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील कोणतीही गोष्ट पुन्हा जागेवर न ठेवल्यास | ०५ |
| ०६. | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी अग्निशामक यंत्र पूर्णपणे बंद न केल्यास | ०५ |
| ०७. | आग विझवितांना जळते इंधन (पेट्रोल) सांडून पसरल्यास | १० |
| ०८. | अग्निशामक यंत्र बंद न केल्यास | ०५ |
| ०९. | आग विझविता न आल्यास | अपात्र |
| १०. | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी अग्निशामक यंत्र पूर्णपणे बंद न केल्यास | ०५ |

* * * * *

## स्पर्धा प्रकार क्र. ३ :- महिलांसाठी एकेरी अग्निशमन कवायत

१ X १.८ कि.ग्रॅ.चा सीओटू अग्निशामक यंत्र

**कवायत**

महिला स्पर्धक आरंभ् रेषेपासून २५ फुटांवरील साधनसामुग्रीच्या रेषेपर्यंत धावत जाईल. ती तेथून १.८ कि.ग्रॅ. वजनाचे सीओटू अग्निशामक यंत्र घेईल ५० फूट धावत जाईल आणि (१८ X १८) च्या ट्रेमधील पेट्रोलची आग विझवेल. त्यानंतर ती अग्निशामक यंत्र घेऊन १५ फूट अंतरावरील अंतिम रेषेपयैत धावत जाईल. अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी तिने अग्निशामक यंत्र बंद केले पाहिजे. कवायत पूर्ण झाल्यावर पंच शिटटी वाजवतील.

यात सहभागी झालेल्या सर्व महिला स्पर्धकांसाठी १५० मि.ली. पेट्रोल, सुरवातीची शिटटी वाजविण्यापूर्वी ५ सेकंद अगोदर जाळण्यात येईल.

**पंचांची बाजू**

आग विझविण्यासाठीच्या कवायतीत दोन बाजू असतील. त्यापैकी एक म्हणजे, साधनसामुग्रीची बाजू (मागील बाजू) व दुसरी म्हणजे आगीची बाजू (समोरील बाजू) अशा दोन बाजू पंचासाठी असतील. प्रत्येक बाजूसाठी स्वत्ंत्र पंच नियुक्त केले जातील. तसेच शिटटी वाजविणे, स्पर्धेला लागलेल्या एकूण वेळेची नोंद ठेवणे याकरीता आणखी एक पंच असेल आणि तो सर्वोच्च निर्णेता (रेफरी) असेल.

प्रत्येक पंचाकडे त्याच्यासमोर सुरु असलेल्या स्पर्धेच्या वेळेची नोद घेण्याकरीता स्टॉपवॉच असेल. तीन पंचांनी नोंदवलेला स्पर्धा प्रकाराला लागलेली सरासरी वेळ ही स्पर्धा प्रकाराला लागलेली वेळ असल्याचे मानण्यांत येईल. स्पर्धेच्या आरंभी व ती संपतेवेळी याप्रमाणे दोनदा शिटटी वाजविण्यांत येईल.

निर्णेताचा (रेफरीचा) निर्णय अंतिम राहील.

**टीप :-** आग विझविण्यासाठी घेतलेल्या कवायतीत सहभागी झालेल्या स्पर्धकाला झालेली कोणतीही इजा किंवा यात वापरलेल्या साधनसामुग्रीची झालेली हानी अशा कोणत्याही गोष्टीसाठी आयोयक जबाबदार असणार नाही.

हा स्पर्धा प्रकार एकंदर सर्वोत्कृष्ठ कामगिरी ठरविण्यासाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

| **दंड (गुणकपात)** | | **सेंकद** |
|---|---|---|
| **(अ) साधनसामुग्रीची बाजू** | | |
| ०१. | शिटटी वाजविण्यापूर्वी खेळास सुरुवात केल्यास | अपात्र |
| ०२. | हेल्मेट (शिरस्त्राण) किंवा गणवेशापैकी कोणतीही वस्तू न घातल्यास | ०२ |
| ०३ | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी /अंतिम शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेशातील कोणतही वस्तू जागच्या जागी न ठेवल्यास | ०५ |
| ०४. | अग्निशामक यंत्र बंद न केल्यास | ०५ |
| ०५. | आरंभ रेषा ओलांडण्यापूर्वी अग्निशामक यंत्र चालू केल्यास | ०५ |
| ०६. | अग्निशामक यंत्र धसमुसळेपणाने/अयोग्य रितीने हाताळल्यास | ०२ |

**<u>(ब) आगीची बाजू</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | प्रात्यक्षिक रेषेवरील चिन्हांकित चौकोनाजवळ अग्निशामक यंत्र चालू न केल्यास | ०५ |
| ०२. | अग्निशामक यंत्राचा धसमुसळेपणाने/अयोग्य वापर | ०२ |
| ०३. | शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील अन्य कोणतीही गोष्ट न घातल्यास | ०२ |
| ०४. | अंतिम रेषेपर्यंत पोचण्यापूर्वी/ शेवटची शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील कोणतीही गोष्ट पुन्हा जागेवर न ठेवल्यास | ०५ |
| ०५. | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी अग्निशामक यंत्र पूर्णपणे बंद न केल्यास | ०५ |
| ०६. | आग विझवितांना जळते इंधन (पेट्रोल) सांडून पसरल्यास | १० |
| ०७. | अग्निशामक यंत्र बंद न केल्यास | ०५ |
| ०८. | आग विझविता न आल्यास | अपात्र |

* * * * *

## खेळ क्र. ४ :- महिलांसाठी असलेली स्पयंपाक घरातील आग विझविण्यासाठीची कवायत

१ X १० लिटर क्षमतेचे पात्र
२ १ /२" X २ १ /२"  आकाराचा १ कपडा
१ बादली पाणी
१ लाकडी स्टूल

**कवायत**

१ लिटर डिझेल + १०० ग्रॅम टाकाऊ कापूस + २५ मि.लि.पेट्रोल ठेवलेल्या १० लि.च्या पात्रापासून ५० फूटांवरील आरंभ रेषेवर एक महिला स्पर्धक उभी असेल व आरंभ रेषेपासून ४५ फूट अंतरावर १ बादली आणि २ १ /२" X २ १ /२" आकाराचा कपडा ठेवलेला असेल.

कवायत/खेळ सुरु झाल्याची शिटटी वाजविल्यावर, स्पर्धक आरंभ रेषेपासून पाण्याच्या बादलीच्या दिशेने धावत जाईल, कपडा घेऊन तो पाण्यात बुडवून आगीपासून बचाव करण्यासाठी तो बोटांना गुंडाळण्यात येईल तसेच तो आग लावलेल्या पात्राला आच्छादण्यात येईल.
त्यानंतर, स्पर्धक आरंभ् रेषेकडे परत येईल. कवायत पूर्ण झाल्यावर पंच शिटटी वाजवतील.

**पंचाची बाजू**

आग विझविण्यासाठीच्या कवायतीत दोन बाजू असतील. त्यापैकी एक म्हणजे, साधनसामुग्रीची बाजू (मागील बाजू) व दुसरी म्हणजे आगीची बाजू (समोरील बाजू) अशा दोन बाजू पंचासाठी असतील. प्रत्येक बाजूच्या कामगिरीसाठी स्वतंत्र पंच नियुक्त केले जातील. तसेच शिटटी वाजविणे, स्पर्धेला लागलेल्या एकूण वेळाची नोंद ठेवणे याकरीता आणखी एक पंच असेल आणि तो सर्वाच्च निर्णेता (रेफरी) असेल.

प्रत्येक पंचाकडे त्याच्यासमोर सुरु असलेल्या स्पर्धा प्रकाराच्या वेळेची नोद घेण्याकरीता स्टॉपवॉच असेल. तीन पंचांनी नोंदवलेला स्पर्धेला लागलेली सरासरी वेळ ही स्पर्धेला लागलेली वेळ असल्याचे मानण्यांत येईल. स्पर्धेच्या आरंभी व ती संपतेवेळी याप्रमाणे दोनदा शिटटी वाजविण्यांत येईल.

निर्णेताचा (रेफरीचा) निर्णय अंतिम राहील.

**टीप :-** आग विझविण्यासाठी घेतलेल्या कवायतीत सहभागी झालेल्या स्पर्धकाला झालेली कोणतीही इजा किंवा यात वापरलेल्या साधनसामुग्रीची झालेली हानी अशा कोणत्याही गोष्टीसाठी आयोजक जबाबदार असणार नाही.

हा स्पर्धा प्रकार एकंदर सर्वोत्कृष्ठ कामगिरी ठरविण्यासाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

| **दंड (गुण कपात)** | | **सेंकद** |
|---|---|---|
| **<u>(अ) साधनसामुग्रीची बाजू</u>** | | |
| ०१. | शिटटी वाजण्यापूर्वी खेळास सुरवात केल्यास | अपात्र |
| ०२. | हेल्मेट किंवा गणवेषातील अन्य कोणतीही वस्तू न घातल्यास | ०२ |
| ०३ | अंतिम रेषेवर पोचण्यापूर्वी /अंतिम शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेशातील कोणतही वस्तू जागच्या जागी न ठेवल्यास | ०५ |
| ०४. | साधनसामुग्री (बादली, कपडा इ.) जागच्या जागी न ठेवल्यास | ०५ |
| ०५. | अग्निशामक यंत्र धसमुसळेपणाने/अयोग्य रितीने हाताळल्यास | ०२ |
| **<u>(ब) आगीची बाजू</u>** | | |
| ०१. | आग विझविताना बोटे भाजू नयेत याची काळजी/सुरक्षितता न बाळगल्यास | ०५ |
| ०२. | अंतिम रेषेपर्यंत न पोचल्यास | अपूर्ण |
| ०३. | आग विझवितांना जळते इंधन (पेट्रोल) सांडून पसरल्यास | १० |
| ०४. | आग विझवितांना इंधनाचा ट्रे/स्टँड खाली पडल्यास | अपात्र |
| ०५. | शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील अन्य कोणतीही गोष्ट न घातल्यास | ०२ |
| ०६. | अंतिम रेषेपर्यंत पोचण्यापूर्वी/ शेवटची शिटटी वाजण्यापूर्वी शिरस्त्राण (हेल्मेट) किंवा गणवेषातील कोणतीही अपात्र पुन्हा जागेवर न ठेवल्यास | ०५ |
| ०७. | साधनसामुग्री (बादली, कपडा इ.) हातातून पडल्यास | ०५ |
| ०८. | अग्निशामक यंत्राचा धसमुसळेपणाने/अयोग्य वापर | ०२ |
| ०९. | आग विझविता न आल्यास | अपात्र |

* * * * *

## खेळ क्र. ५ :- पुरुषांसाठी एकेरी पुरुष होझ पाईप गुंडाळीची (होझ रील) कवायत

शिटटी वाजविल्यावर स्पर्धक आग विझविण्याच्या लवचिक होझ पाईपच्या (होझ रील) गुंडाळीकडे २५ फूट एवढे अंतर धावत जाईल. लहान झडप उघडून स्पर्धा प्रकार सुरु करणा-या मनुष्याकडे (स्टार्टरकडे) होझ पाईप ५० फुटांपर्यंत ओढत नेईल.

तेथून पेटीपासून सुमारे १५ फूट अंतरावर असणा-या लक्ष्यावर मारा करील. लक्ष्यावर मारा केल्यानंतर, स्पर्धक पाईपची तोटी बंद करील आणि होझ पाईपच्या गुंडाळीकडे परत येईल. गुंडाळीची झडप बंद करुन आरंभ रेषा (स्टार्टींग लाईन) पार करील.

आरंभ रेषा (स्टार्टींग लाईन) पार केल्यानंतर पंच शिटी वाजवतील. तेथे दोन पंच व एक निर्णेता असेल. निर्णेता सुरवातीला व श्ेवटी शिटी वाजवतील. निर्णेता आणि पंच यांच्या प्रत्येकाकडे विराम घडयाळ (स्टॅाप वॅाच) असेल. तीनही घडयांळामध्ये नोंदवलेली सरासरी वेळ हा खेळाला लागलेली वेळ असल्याचे मानण्यात येईल.

निर्णेताचा निर्णय अंतिम असेल.

पंच दोन बाजूला असतील --

अ) होझ पाईप गुंडाळीकडील (होझरील) बाजू (पंपाकडील बाजू)
ब) आगीकडील बाजू

**टीप :-** १) पुरुषांसाठी आरंभ रेषा व कृती चौकोन (ऑपरेटींग स्क्वेअर) यांच्यामध्ये १०० फुटांचे अंतर असेल.
२) कवायत स्पर्धांचे आयोजक स्पर्धकाला होणा-या कोणत्याही इजेबददल किंवा साधन सामुग्रीच्या होणा-या हानीबददल जबाबदार राहणार नाही.

| **दंड (गुण कपात)** | | **सेंकद** |
|---|---|---|
| **<u>अ) होझ पाईप गुंडाळीकडील (होझरील) बाजू (पंपाकडील बाजू)</u>** | | |
| ०१. | पहिला शिटटी वाजण्यापूर्वीच सुरुवात करणे | अपात्र |
| ०२. | पहिली शिटी वाजण्यापूर्वीच होझपाईपची गुंडाळीची झडप उघडणे | १० |
| ०३. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू न घालणे | ०२ |
| ०४. | समाप्त रेषेवर पोहण्यापूर्वी /शेवटची शिटटी वाजविण्यापूर्वी हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू पून्हा जागेवर न ठेवणे | ०५ |
| ०५. | होझ पाईपची गुंडाळी धसमुसळेपणाने/अव्यवस्थितपणे हाताळणे | ०२ |
| ०६. | कवायत संपण्याच्या वेळी समाप्त रेषेवर न पोहचणे | अपूर्ण |
| ०७. | होझ पाईप पूर्णपणे न गुंडाळणे | ०५ |
| ०८. | होझ पाईपच्या गुंडाळीची झडप पूर्णपणे बंद न करणे. | १५ |
| **<u>ब्) आगीकडील बाजू</u>** | | |
| ०१. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू न घालणे | ०२ |
| ०२. | समाप्त रेषेवर पोहचण्यापूर्वी / श्ेवटची शिटटी वाजण्यापूर्वी हेल्मेट /गणवेषाची इतर वस्तू जागेवर न ठेवणे | ०५ |
| ०३. | कृती चौरसामध्ये जाण्यापूर्वीच तोटीची झडप (नोझल) सुरु करणे | ०५ |
| ०४. | आग विझविताना / लक्ष्यावर मारा करतांना कृती चौरसामध्ये उभे न राहणे (म्हणजे आग विझवितांना / लक्ष्यावर मारा करतांना चौरसाची रेषा ओलांडणे किंवा पार करणे) | ०५ |
| ०५. | लक्ष्य गाठण्यापूर्वीच चौरसाच्या बाहेर पडणे | अपूर्ण |
| ०६. | लक्ष्या गाठण्यापूर्वीच / आग विझविण्यापूर्वीच झडप (नोझल) बंद करणे | अपात्र |

* * * * *

## खेळ क्र. ६ :- अधिका-यांसाठी दोन पुरुषांनी करावयाची नळखांब कवायत

प्रात्यक्षिक जिच्या सहाय्याने करावयाचे त्या होझ पाईपची लांबी १ X ५० फूट
५/८ इंची तोटी व्यास असलेली नळी
पाण्याने भरलेली दोन पिंपे/ड्रम

**कवायत**

साधनसामुग्री नळखांब रेषेवर ठेवावी. पुरुषाने आरंभ रेषेवर स्वस्थ उभे रहावे. शिटी वाजल्यावर, नळखांब रेषेकडे धावत जाऊन परमालाईन होज पाईप व तोटी घ्यावी, ५० फूटी होझ पाईप नळखांबाला जोडावी. इशारा दिल्यावर त्यातून सुमारे दोन पिंप/ड्रम पाण्याने भरावेत. नळी होजला जोडून दिलेल्या जागेतून लक्ष्याचा वेध घ्यावा. स्पर्धकाकडून सूचना आल्यावरच नळखांब झडपेजवळ उभ्या असलेल्या दुस-या व्यक्तीच्या सहाय्याने पुरविण्यांत आलेल्या तोटीकडून लक्ष्यावर मारा करावा. दुसरी व्यक्ती आरंभ रेषेवर विरुध्द बाजूकडे तोंड करुन उभी राहील. स्पर्धकाकडून इशारा मिळाल्यानंतरच ती व्यकती नळखांबाकडे धावत जाईल. परमालाईन होज पाईपाची गुंडाळी करुन ती अंतिम रेषेवर म्हणजे होजपाईप ज्या रेषेवरुन उचलली होती त्या रेषेवर ठेवावी. होज पाईपाची गुंडाळी करण्यापूर्वी त्यातून पाणी काढतांना होझ पाईप खांदयापयैत उचलवा. गुंडाळी सरळ रेषेत करावी. होझ पाईपाची गुंडाळी ओढत नेऊन करता येईल. मात्र त्याचे वेटोळे हे एकसारखे व सपाट आले पाहिजे. नळी हातळणा-या व्यक्तीकडून (ब्रांच मन) सूचना मिळाल्यानंतरच सहाय्यक हा नळखांबाची झडप उघडील आणि बंद करील.

**दंड (गुण कपात)** — **सेंकद**

**<u>अ) नळखांबाकडील बाजू</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | पहिली शिटी वाजण्यापूर्वीच सुरुवात करणे. | अपात्र |
| ०२. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू न घालणे. | ०२ |
| ०३. | समाप्त रेषेवर पोहचण्यापूर्वी / श्वेटची शिटटी वाजण्यापूर्वी हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू जागेवर न ठेवणे. | ०५ |
| ०४. | पाणी सोडल्यानंतर नळखांबाजवळ कुणालाही उभे न करता (लक्ष ठेवण्यास न सांगता) तो तसाच टाकून जाणे. | ०५ |
| ०५. | होझ पाईप अयोग्यपणे व तो अस्ताव्यस्त पसरला असता लगेच नीट न करणे. | ०२ |
| ०६. | साधनसामुग्री धसमुसळेपणाने / अव्यवस्थितपणे हाताळणे | ०२ |
| ०७. | साधनसामुग्री उपतोटी (ब्रान्च), कपलींग (संधायक) खाली पाडणे. | ०५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| ०८. | कपलींग (संधायक), होझ पाईप यासारखी साधनसामुग्री आपटणे किंवा फरफटत नेणे. | ०५ (प्रत्येक चुकीसाठी) |

**<u>ब) आगीकडील बाजू</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | नळी खाली ठेवणे किंवा तेथे कुणालाही लक्ष ठेवण्यास न सांगता ती तशीच सोडून जाणे. | ०२ |
| ०२. | साधनसामुग्री धसमुसळेपणाने / अयोग्य रितीने हाताळणे. | ०२ |
| ०३. | साधनसामुग्री नळी, संधायक इ.) खाली पाडणे. | ०५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| ०४. | होझ पाईप अयोग्यपणे अंथरणे / पसरवणे, नीट न ठेवणे. | ०२ |
| ०५. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू न घालणे. | ०२ |
| ०६. | समाप्त रेषेवर पोहचण्यापूर्वी / शेवटची शिटटी वाजण्यापूर्वी हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू पुन्हा जागेवर न ठेवणे. | ०५ |
| ०७. | होझपाईप मधील पाणी व्यवस्थित न काढणे. | ०५ |
| ०८. | होझ पाईपचे वेटोळे (गुंडाळी) व्यवस्थित न करणे. | ०५ |
| ०९. | लक्ष्य भेद न करणे . | अपात्र |
| १०. | एखादी साधनसामुग्री/वस्तू स्पर्धा मैदानावर विसरणे | ०५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| ११. | क पलींग (संधायक), होझपाईप, साधनसामुग्री आपटणे किंवा फरपटणे. | ०५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| १२. | लक्ष्य गाठतांना दिलेल्या पेटीकेमध्ये उभे न राहणे. | ०५ |
| १३. | प्रत्येक उल्लंघनाबददल पिंपाभोवती होझ पाईप चालू न ठेवणे. | ०५ |

* * * * *

## खेळ क्र. ७ :- संघ नायकासह चार पुरुषांची दुहेरी भाग नळखांब कवायत (ओली)

होझ पाईप (लांबी ३ X ५० फूट)
दुभाजक वियोजी / तोडी (बंदूकीचा धातू)
५/८ इंची तोंड असलेल्या उपतोटया
गुडघ्यापयैत येणारे रबरी बूट
हनुवटी पटटी व युज पटटी (कापडी किंवा चामडी) असलेले हेल्मेट

**कवायत**

साधनसामुग्री रेषेच्या मागे् नळखांब पेटीकेच्या कोणत्याही बाजूला साधनसामुग्री ठेवावी. पुरुषांनी आरंभ रेषेवर २५ फूट लांब अंतरावर नळखांबाकडे तोंड करुन स्वस्थ उभे रहावे. कवायत सुरु करणारा आरंभक (स्टार्टर) हा कवायत सुरु करण्यासाठी शिटी वाजवील. खाली दर्शविल्याप्रमाणे नंतर शिटटीदवारे सूचना देऊन संध नायक संघाचे नेतृत्व करील. परंतू संघनायक इतर कोणत्याही प्रकारे आपल्या संघास सहाय्य करणार नाही.

**भाग एक** - शिटटी वाजल्यावर नळखांबावरून ३ X ५० फूट लांबीचे होझ पाईप नळीला जोडावेत पाणी सुरु करुन लक्ष्य भेदावे. आरंभकाची शिटटी वाजल्यानंतर कोणत्याही वेळी पाणी सुरु करता येईल.

**भाग दोन** - नळी होजपासून विलग करावी. अंथरलेल्या / पसरवलेल्या शे्वटच्या २ X ५० फूट लांबीच्या होझपाइप मधील पाणी् काढावे व गुंडाळी करावी. १ X ५० फूट लांबीच्या (नळखांबाकडील) होझ पाईपला विभाजक जोडावा. धावत जाऊन विभाजकाला (२ X ५० फूट लांबीचा) होझ पाईप परत जोडून त्यांना नळया (२) जोडाव्या. शिटी वाजल्यावर पाणी सुरु करुन लक्ष्य (२) भेद करावे.

**भाग तीन** - अंथरलेल्या / पसरवलेल्या तीनही होज पाईपची पाणी काढून गुंडळी करावी व ती गुंडाळी करावी नळखांब रेषेवर ठेवावी त्यावेळी अधिकृत आरंभक शेवटची शिटटी वाजवील त्यावेळी नळखांब रेषेवर ठेवावी. सर्व साधनसामुग्री ( ३ होझ पाईप, दुभाजक वियोजी व नळया (तोटया) ) जेव्हा नळखांब रेषेवर ठेवण्यांत येईल तेव्हा कवायत समाप्त होईल.

**टीपा** -

१. पाणी सुरु केल्यानंतर नळखांब व जोडणी केलेल्या शाखा यांच्यावर एका व्यक्तीने देखरेख ठेवावी.
२. नळखांब ६ फूट आत चौकोनात असेल व बाहेर त्याचा एक फूट नेहमी चौकोनात असेल.
३. भाग एक संपण्याच्या वेळी नळीजवळ २ व्यक्ती असतील आणि २ व्यक्ती साधनसामुग्रीरेषेवर असतील.
४. भाग दोन संपण्याच्यावेळी प्रत्येक नळीजवळ १ व्यक्ती, नळखांबाजवळ एक आणि २’ X ४’ जवळ एक व्यक्ती असेल.

५. भाग एक नंतर व कवायत संपण्याच्या वेळी लगेच पुन्हा वापरण्यासाठी होझ पाईप मधील पाणी काढून त्यांची संपूर्ण गुंडाळी केलेली असावी. होझ पाईपांची जोडी केलेल्या, तुटक किंवा लांबलचक स्वरुपात अंशतः गुंडाळी करु नये.
६. होझ पाईपांची गुंडाळी शिडांचा वापर करुन करता येईल. तेथे तीन परीक्षक असतील आणि शिटी वाजविण्यासाठी रेफरी (पंच) असेल.
७. रेफरी व दोन परिक्षकांकडे विराम घडयाळे असतील.
८. तीनही घडयाळांमध्ये नोंदवलेली सरासरी वेळ ही स्पर्धेची वेळ म्हणून विचारात घेण्यांत येईल.
९. रेफरी (पंच) हो सुरवातीला व शे्वटी शिटटी वाजवतील.
१०. रेफरीचा निर्णय अंतिम असेल.
११. कवायत स्पर्धांचे आयोजक स्पर्धकाला झालेल्या दुखापतीबददल किंवा कोणत्याही सामुग्रीच्या होणा-या हानीबददल जबाबदार राहीणार नाही.

**पंच तीन बाजूला असतील :-**

अ) नळखांबाकडील बाजू
ब) आगीकडील डावी बाजू
क) आगीकडील उजवी बाजू

| **दंड (गुण कपात)** | | **सेंकद** |
|---|---|---|
| **<u>अ) नळखांबाकडील बाजू</u>** | | |
| १. | पहिली शिटटी वाजण्यापूर्वीच सुरुवात करणे. . | अपात्र |
| २. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू काढून टाकणे | २ |
| ३. | समाप्त रेषेवर पोहचण्यापूर्वी / शे्वटची शिटी वाजण्यापूर्वी हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू पुन्हा जागेवर ठेवणे. | ५ |

| | | |
|---|---|---|
| ४. | पाणी सोडल्यानंतर नळखांबाजवळ कोणालाही उभे न करता / लक्ष ठेवण्यास न सांगता तो तसाच टाकून जाणे. | ५ |
| ५. | अयोग्यपणे अंथरलेले होजपाईप लगेच व्यवस्थित न करणे | २ |
| ६. | साधनसामुग्री धसमुसळेपणाने / अव्यस्थितपणे हाताळणे. | २ |
| ७. | साधनसामुग्री (ब्रान्च (उपतोटी), शाखा कपलींग इ.) खाली पाडणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| ८. | लक्ष्य रेषेवर पोहचण्यापूर्वीच किंवा सहका-याचा अथवा जोडीदाराचा होकार मिळण्यापूर्वीच होझ पाईपची गुंडाळी उकलण्यास सुरवात करणे | ५ |
| ९. | कपलींग , लांब नळी इ. साधनसामुग्री आपटणे किंवा फरपटत नेणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |

**ब) आगीकडील डावी बाजू**

| | | |
|---|---|---|
| ०१. | वियोजी वरच्या बाजूला कानपा असलेल्या स्थिती न ठेवणे | २ |
| ०२. | वियोजीच्या दोहोंपैकी कोणत्याही एका बाजूस होझपाईप आडवा जाणे | २ |
| ०३. | तजवीज केलेल्या जागेत २' X ४' वियोजी नीट न ठेवणे. | २ |
| ०४. | संघ नायकाकडून इशारा मिळण्यापूर्वी / त्याने शिटटी बाजविण्यापूर्वी कवायतीच्या दुसऱ्या भागाला सुरवात करणे. | १० |
| ०५. | आधीचा भाग पूर्ण होण्यापूर्वीच पुढच्या भागासाठी संघनायकाने इशारा देणे / शिटटी वाजविणे. | ५ |
| ०६. | नळी (तोटी) जवळ न थांबता ती खाली ठेवून निघून जाणे किंवा तिला एकाकी सोडणे. | २ |
| ०७. | ब्रांचमनने (शाखेजवळ असलेल्या व्यक्तीने) आपले लक्ष्य भेदण्यापूर्वीच दुसरे लक्ष्य भेदणे. | २ |
| ०८. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू न घातल्यास. | २ |
| ०९. | समाप्त रेषेवर पोहचण्यापूर्वी / श्वेटची शिटटी वाजण्यापूर्वी हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू जागेवर ठेवणे. | ५ |
| १०. | अयोग्यपणे अंथरलेले होज पाईप लगेच व्यवस्थित न करणे | २ |
| ११. | साधनसामुग्री अव्यस्थितपणे /अयोग्यपणे हाताळणे. | २ |
| १२. | साधनसामुग्री (शाखा, कपलींग इ.) खाली पाडणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| १३. | संघनायकाने इशारा देण्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे मदत करणे. | अपात्र |

| | | |
|---|---|---|
| १४. | होझ पाईप मधील पाणी न काढणे. | ५ |
| १५. | होझ पाईपची व्यवस्थित गुंडाळी न करणे. (गुंडाळी विस्कटणे) | ५ |
| १६. | आपले लक्ष न भेदणे. | अपात्र |
| १७. | एखादी साधनसामुग्री/वस्तू स्पर्धा मैदानावर विसरणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| १८. | कपलींग, होझ पाईप, साधनसामुग्री आपटणे किंवा फरफटत नेणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |

**<u>क) आगीकडील उजवी बाजू</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | वियोजी वरील बाजूस कानपा येईल अशा स्थितीत न ठेवणे | २ |
| ०२. | वियोजीच्या कोणत्याही एका बाजूस होझपाईप आडवा येणे | २ |
| ०३. | तजवीज केलेल्या जागेत २' X ४' वियोजी नीट न ठेवणे. | २ |
| ०४. | संघ नायकाकडून इशारा मिळण्यापूर्वी / त्याने शिटटी बाजविण्यापूर्वी कवायतीच्या दुसऱ्या भागाला सुरवात करणे. | १० |
| ०५. | आधीचा भाग पूर्ण होण्यापूर्वीच पुढच्या भागासाठी संघनायकाने इशारा देणे / शिटटी वाजविणे. | ५ |
| ०६. | शाखे (तोटी) जवळ न थांबता ती खाली ठेवून निघून जाणे किंवा तिला एकाकी सोडणे. | २ |
| ०७. | ब्रांचमनने (शाखेजवळ असलेल्या व्यक्तीने) आपले लक्ष्य भेदण्यापूर्वीच दुसरे लक्ष्य भेदणे. | अपात्र |
| ०८. | हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू न घातल्यास. | २ |
| ०९. | समाप्त रेषेवर पोहचण्यापूर्वी / श्र्वेटची शिटटी वाजण्यापूर्वी हेल्मेट किंवा गणवेषाची इतर वस्तू पुन्हा न घालणे. | ५ |
| १०. | अयोग्यपणे अंथरलेले होजपाईप लगेच व्यवस्थित न करणे. | २ |
| ११. | साधनसामुग्री अव्यस्थितपणे /अयोग्यपणे हाताळणे. | २ |
| १२. | साधनसामुग्री (नळी, कपलींग इ.) खाली पाडणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| १३. | संघनायकाने इशारा देण्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे मदत करणे. | अपात्र |
| १४. | होझ पाईप मधील पाणी न काढणे. | ५ |
| १५. | होझ पाईपची व्यवस्थित गुंडाळी न करणे. (गुंडाळी विस्कटणे) | ५ |
| १६. | आपले लक्ष न भ्देणे. | अपात्र |
| १७. | एखादी साधनसामुग्री/वस्तू मैदानावर विसरणे | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |
| १८. | कपलींग, होझ पाईप, साधनसामुग्री आपटणे किंवा फरफटत नेणे. | ५ (प्रत्येक चुकीसाठी) |

---

**निर्माते :- श्री. बी. बी. सुर्वे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल**
**श्री. अजित गडदे, विभागीय अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल.**

# संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व_अग्निशमन सल्लगार, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय, मुंबई - ४०० ०९८.

# अग्निशमन सेवा सप्ताह

## विविध प्रकारच्या कौशल्यविषयक अग्निशमन कवायत स्पर्धोचे नियम

एक - प्रत्येक संघात ४ अग्निशामक, १ यंत्रचालक व १ प्रमुख अग्निशामक किंवा अग्निशमन अधिकारी व १ राखीव सदस्य यांचा समावेश असेल.
प्रत्येक संघातील सदस्य आपआपले गणवेष परिधान करतील. हेल्मेट व गुडघ्यापर्यंतचे रबरी बूट घालणे अनिवार्य असेल.

टीप :- संघ यशस्वी झाल्यास राखीव सदस्य प्रमाणपत्र मिळण्यास पात्र होईल.

**दोन** - संघाची व साधन सामुग्रीची जागा

१. आरंभ रेषा, पाण्याच्या टेंडरपासून २० फूट इतकी लांब आखलेली असेल. पाण्याचा टेंडर हा अग्निकवायत मनो-यापासून सुमारे १०० फूट लांब ठेवलेला असेल.
२. पाण्याच्या टेंडरला मागील वरच्या बाजूस पंप बसवून तो सज्ज ठेवण्यांत येईल. ४८ फूटांहून कमी लांबी नसलेल्या प्रत्येक होझ पाईपला १ /२ इंची तोटी बसविलेल्या योग्य त्या नळया असतील. १५ मीटर लांबीची विस्तारीत शिडी वाहनाच्या स्तंभावर बसविण्यांत येईल. वर नमूद केलेली सर्व साधनसामुग्री ही त्या त्या कुलूपबंद खणात ठेवण्यांत येईल.
३. आगीचे लक्ष्य हे पाण्याच्या टेंडरपासून अंदाजे १२० फूट अंतरावर असले.

**तीन** - स्पर्धेचा क्रम

१. स्पर्धक संध आरंभ रेषेवर पाण्याच्या टेंडरकडे तोंड करुन सज्ज असेल.
२. पहिली शिटटी वाजल्यावर, प्रभारी अधिका-याच्या नियोजित डावपेचानुसार पाण्याच्या टेंडर पासून सदस्याने आपले काम पुढील रितीने पार पाडावे.

(क) विस्तारीत शिडी पाण्याच्या टेंडरवरुन काढून अग्निकवायत मनो-याच्या (उंच इमारत) दुस-या मजल्यापयैत ती विस्तारीत करुन कर्मचारी गणातील एक सदस्य अग्निकवायत मनो-यावर असलेल्या व्यक्तीची सुटका करील. त्याचवेळी, कर्मचारी गणातील दुसरा सदस्य मागील बाजूस बसविलेल्या पंपापासून प्रत्येकी ४८ फूटांहून कमी लांबीच्या नसलेल्या दोन होझ पाईपांपैकी केवळ एक होझ पाईप जमिनीवर पूर्णपणे अंथरतील. साधन टाकीतील पाण्याचा वापर लक्ष्य भेदण्यासाठी करण्यांत येईल. व्यक्तीची केलेली सुटका अथवा लक्ष्याचा केलेला भेद यापैकी जे उशिरा होईल त्यानंतर दुसरी शिटटी वाजविण्यांत येईल. पैकी जे उशिरा होईल त्यानंतर दुसरी शिटी वाजविण्यापूर्वी साधनसामुग्रीची आवराआवर करण्यांस सुरुवात करु नये. दुसरी शिटटी वाजल्यावर शिडी काळजीपूर्वक पाण्याच्या टेंडरवर परत ठेवावी व इतर साधनसामुग्री म्हणजे होझ पाईप नळी इत्यादी त्यांच्या जागी परत आणून ठेवावी. सर्व साधनसामुग्री आणून ठेवल्यावर संघ आरंभरेषा पार करील तेव्हा अंतिम शिटी वाजविण्यात येईल.

(ख) पहिली शिटटी वाजविल्यापासून व शेवटची शिटटी वाजविल्यापर्यंतची वेळ ही संघाल कवायत पूर्ण करण्यासाठी लागलेला एकूण वेळ असेल.

(ग) निकाल घोषित करण्यापूर्वी कोणताही आक्षेप/हरकत असल्यास नोंद घेण्यासाठी फक्त संघाच्या व्यवस्थपकाला प्राधिकृत केलेले असेल. मात्र परिक्षकांचा त्याबाबतचा निर्णय अंतिम असेल.

**चार** - अंतिम वेळ

प्रत्यक्ष वेळ अधिक दंडात्मक वेळ ही अंतिम वेळ म्हणून नोंदविण्यांत येईल.

**पाच** - विजेता

कमी वेळात संपूर्ण कवायत पूर्ण करणा-या संघाला विजेता संघ म्हणून घोषित करण्यांत येईल.

******

## संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व_अग्निशमन सल्लगार, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय, मुंबई - ४०० ०९८.

## अग्निशमन सेवा सप्ताह

### विविध प्रकारच्या कौशल्यविषयक अग्निशमन कवायत स्पर्धोच्या दंड

१. (क) शिडीवरून घसरत येण्यास परवानगी नसेल घसरत येण्याच्या या पध्दतीचा अवलंब करणा-या कोणत्याही संघास अपात्र ठरविण्यांत येईल.
(ख) शिडीवर उडया मारत चढणा-यास अपात्र ठरविण्यांत येईल.

२. आग विझवितांना किंवा मिटवितांना शिडी जमिनीवर किंवा इमारतीवर (टॉवर) आदळण्याच्या प्रत्येक प्रसंगी शिक्षा होईल.
-- प्रत्येक चुकीसाठी २ सेकंद

३. कवायत मनो-यावर आखलेला आडव्या रेषेपर्यंत शिडी न नेणे
-- प्रत्येक चुकीसाठी २ सेकंद

४. कर्मचारी गणातील सदस्य चढत किंवा उतरत असताना शिडी न पकडणे.
-- प्रत्येक चुकीसाठी २ सेकंद

५. डमीला खाली आणताना तो खांद्यावरुन खाली घसरुन पडणे आणि त्यास धक्का देवून स्थिर करत असतना आपटणे.
-- २० सेकंद

६. शिडी जागेवर बसवतांना वाहन स्तंभावर जोरात आदळणे.
-- ३ सेकंद

७. शिडी विस्तारीत करण्यांस असमर्थ
-- ५ सेकंद

८. फायर टेंडरवर शिडी व्यवस्थित न बसविणे.
-- २ सेकंद

९. सुटका करताना व स्ट्रेचरवर खाली ठेवताना डमीला व्यवस्थित न हाताळणे
-- प्रत्येक चुकीसाठी ३ सेकंद

१०. डमीला योग्य जागी न ठेवणे
-- २ सेकंद

११. डमीला योग्य रितीने न ठेवणे
-- २ सेकंद

१२. शिडी अगदी खाली आधार रेषेच्या मध्ये न ठेवणे.
-- २ सेकंद

१३. पाण्याचा होझ पाईप जोरात ओढणे.
-- २ सेकंद

१४. होझ पाईपची व्यवस्थित गुंडाळी न करणे.
-- २ सेकंद

१५. साधनसामुग्री व उपकरण चुकीच्या पध्दतीने हाताळणे (नळी आदळणे, कपलींग आपटणे, उपकरण इत्यादीला हानी पोहचणे)
-- प्रत्येक चुकीसाठी २ सेकंद

१६. दुसरी शिटी वाजण्यापूर्वी होझ पाईपची कपलींग किंवा नळी विलग करणे
-- ५ सेकंद

१७. जमिनीवर कवायत साधनसामुग्री किंवा व्यक्ती राहणे
-- ३ सेकंद

१८. योग्य जागी होझ पाईप पुन्हा न ठेवणे
-- प्रत्येक चुकीसाठी ३ सेकंद

१९. नळी योग्य जागी न ठेवणे
-- २ सेकंद

२०. दुसरी शिटी वाजविल्यानंतर दोष निरसन करण्याचा प्रयत्न करणे
-- प्रत्येक चुकीसाठी ३ सेकंद

२१. पंपाचे गिअर मोकळे न करणे
-- ५ सेकंद

२२.दुसरी शिटी वाजविण्यापूर्वी आवरण्यास सुरवात करणे
-- ५ सेकंद

२३. लॉकर व्यवस्थित बंद न करणे.
-- २ सेकंद

* * * * *

## संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लगार, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय, मुंबई - ४०० ०९८.

## अग्निशमन सेवा सप्ताह

## एकेरी पुरुष शिडी कवायत स्पर्धेचे नियम

**गणवेष :**

स्पर्धक नेहमीचा पोषाख परिधान करील, मात्र हेल्मेट व गुडघ्यापर्यंतचे रबरी बूट घालणे अनिवार्य असेल.

**तयारी :**

क) रेफरीच्या (पंचाच्या) मार्गदर्शनाखाली शिडी आगाऊ तयार ठेवण्यात येईल.

ख) आरंभ रेषा ही शिडीपासून १५ फूट लांब अंतरापर्यंत आखलेली असेल.

ग) दुर्घटनाग्रास्त व्यक्तीस आणण्याची जागाजवळच आखण्यात येईल.

घ) दुर्घटनाग्रस्त व्यक्तीसाठीचा डमी ४०-४५ कि.ग्रॅ. वजनाचा असेल.

**कवायत :**

क) परीक्षक शिटी वाजवतील तेव्हा वेळ नोंदविण्यास सुरवात होईल.

ख) स्पर्धक वरच्या मजल्यावर जाऊन अग्निशामक उदवाहनातून दुर्घटनाग्रस्त व्यक्तीला आणील.

ग) तो, दुर्घटनाग्रस्त व्यक्तीला स्ट्रेचरवर व्यवस्थित ठेवील.

घ) तो आरंभ रेषेवर येईल त्यानंतर परीक्षक दुसरी शिटी वाजवून पहिली आणि दुसरी शिटी यामधील वेळ नोंदवील.

**दंड : नोंदविलेल्या वेळेत खालील दंड अधिक केले जातील.**

क) शिडी वर नेताना व खाली आणताना भिंतीवर आदळणे ३ सेकंद

ख) अग्निशामक उदवाहनाने दुर्घटना व्यक्तीस योग्यरितीने वजनाचा ५ सेकंद

तोल न सांभाळणे

ग) खाली आणताना दुर्घटनाग्रस्त व्यक्तीस दाताने धरणे २ सेकंद

घ) दुर्घटनाग्रस्त व्यक्ती खांद्यावरुन निसटणे. २ सेकंद

ड) मानेला धरुन दुर्घटनाग्रस्त व्यक्तीला आदळणे किंवा आपटणे. ५ सेकंद

**अंतिम वेळ :**

प्रत्यक्ष वेळ अधिक दंडाची वेळ ही अंतिम वेळ म्हणून नोंदविण्यांत येईल.

**विजेता :**

कमी वेळामध्ये संपूर्ण कवायत पूर्ण करणा-या स्पर्धकाला विजेता म्हणून घोषित करण्यांत येईल.

**************